# संजय गांधी निराधार अनुदान योजना

**शासन निर्णय :** विसयो -२०१०/प्र.क्र. १७५/विसयो -२, दिनांक २६-१०-२०१०
विसयो २०१०/प्र.क्र. १२७/विसयो -२, दिनांक ३१ ऑक्टोबर २०११

- **निराधारांच्या मासिक लाभांच्या योजनेसाठी शासनाचे सर्वसाधारण निकष :**

सर्वसाधारणपणे समाजाती निराधार व्यक्ती म्हणजे ज्या व्यक्ती स्वत:चा उदरनिर्वाह करु शकत नाहीत, उदा. अपंग, अनाथ, दुर्धर रोगग्रस्त, विधवा स्त्रिया ,एच.आय.व्ही ग्रस्त, अत्याचारित महिला, वेश्याव्यवसायातुन मुक्त केलेल्या महिला, ३५ वर्षावरील अविवाहित महिला इत्यादींना लाभ देण्यात येतो.

**उत्पन्न मर्यादा :- कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न रुपये २१,०००/- किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे.**

या योजनेअंतर्गत लाभर्थ्यांची **मुले २५ वर्षाची होईपर्यत किंवा नोकरी मिळेपर्यत** ( शासकीय/ निमशासकीय /खाजगी ), यामध्ये जे अगोदर घडेल तोपर्यंत लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो.

लाभार्थ्यांना, फक्त मुलीच असतील तर अशा लाभार्थ्यांच्या बाबतीत मुलीचे वय २५ वर्षे झाले अथवा त्यांना नोकरी लागली किंवा त्यांचे लग्न होऊन त्या नांदावयास गेल्या, तरी सुध्दा लाभ चालु राहील.

- **आर्थिक सहाय्य :**

समाजातील ६५ वर्षे वयोगटाखालील वर नमुद केलेल्या प्रवर्गातील लाभार्थ्यांस रुपये ६००/- प्रति महिना अर्थसहाय्य ६५ वर्षे वयोमर्यादेपर्यंत देय आहे. यानंतर हा लाभार्थी शासनाकडुन परस्पर वृध्दापकाळ योजनेत वर्ग करण्यात येतो व त्यांचा लाभ पुढे देखील चालू राहतो.

- **आवश्यक कागदपत्रे :**

वयाचा दाखला, रहिवासी दाखला, किमान १५ वर्षापासून महाराष्ट्र राज्याचा रहिवासी, उत्पन्नाचा दाखला/ दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये समावेश असल्याबद्दलचा साक्षांकित उतारा.

- **संपर्क :**

विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गत सर्व योजनांच्या अधिक माहितीसाठी गावातील तलाठी तसेच तहसिल कार्यालयात संपर्क साधवा.